सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२१४४०
Telephone No. : 020-25621440
ईमेल/ E-mail : coe@unipune.ac.in

परीक्षा समन्वय कक्ष
Exam-Coordination
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. परीक्षा—समन्वय/ 1086

दिनांक : १७/१२/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य,
संबंधित महाविद्यालये,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

विषय : भिमा कोरेगाव या ठिकाणी विजय स्तंभास मानवंदना देण्यासाठी आयोजित कार्यक्रमांमुळे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मधील हिवाळी सत्रातील दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित परीक्षांच्या नियोजनाबाबत..

महोदय / महोदया,

मा. प्राचार्य अल अमीन एज्युकेशनल ॲण्ड मेडिकल फाऊंडेशनचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट स्टडीज कोरेगाव भीमा ता.शिरूर जि. पुणे तसेच विविध विद्यार्थी संघटना यांनी दिनांक ०१ जानेवारी, २०२५ या दिवशी अहिल्यानगर पुणे महामार्गावरील भिमा कोरेगाव या ठिकाणी विजय स्तंभास मानवंदना देण्यासाठी लाखोंच्या संख्येने अनुयायी येत असल्यामुळे पुणे पोलिसांकडून सुरक्षा व्यवस्थेची विशेष बाब म्हणून पुणे अहिल्यानगर महामार्ग शिक्रापूर ते वाघोली पर्यंत वाहतुकीसाठी बंद करण्यात येत असल्याने दिनांक ०१ जानेवारी,२०२५ रोजी आयोजित विद्यापीठ परीक्षांच्या आयोजनाबाबत मार्गदर्शन करण्याचे पत्राव्दारे नमूद केले आहे.

१. संबंधित महाविद्यालयांच्या दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजी नियोजीत परीक्षा त्या त्या महाविद्यालयांच्या जवळ असलेल्या दुस—या महाविद्यालयात आयोजित करण्यात यावी.
२. संबंधित महाविद्यालयातील दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित परीक्षा देवू न शकलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज सर्व कागदपत्रांहित संबधित महाविद्यालयाने तपासून अशा विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेण्यासाठी परीक्षा विभागाकडे विहित मुदतीत सादर करावेत.

मा. प्राचार्य, संबंधित महाविद्यालये यांना विनंती की, दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित विद्यापीठ परीक्षांच्या आयोजनास उपरोक्त नमूद कारणासाठी अडथळा येत असल्यास वरील प्रमाणे नियोजन आपल्या स्तरावर कार्यवाही करावी व कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये याची कृपया दक्षता घेण्यात यावी ही विनंती.

कळावे,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ